


School dropouts serious issue

Caste-based discrimination and insensitivity ensure that children from diverse social and linguistic backgrounds are pushed out of school, says SEEMA RAJPUT






# वार्तापत्र










## जून २०२१

**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏०२२-२२००३०६०

✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## समर्थन


संस्थापक अध्यक्ष : स्व. सदानंद वर्दे

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**



संपादन : **मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण

**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

सहाय्य

**स्नेहा घरत** -८४८५८९४४६३

प्रसिद्धी

**मनोज सातवी** -९२७३७९६९९९

मांडणी

**प्रतिक्षा कोयंडे**



**नोंदणी क्रमांक:**

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०

☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com

website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

संपादकीय

# शिक्षण क्षेत्र, सरकारच्या प्राधान्यक्रमात नाहीच!

कोविड-१९ ही वैश्विक महामारी पसरल्यानंतर शिक्षण क्षेत्रावर देखील त्याचा अनिष्ट परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. युनेस्कोने नुकत्याच जाहीर केलेल्या शिक्षणविषयक अहवालानुसार एप्रिल, २०२० नंतर १८८ देशात १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. तर भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व त्यांना शिक्षण देणारे ८९ लाख शिक्षक घरी बसले आहेत. उच्च शिक्षण देणाऱ्या ५० हजार शिक्षण संस्था बंद असून त्यात शिकणारे ३ कोटी ७० लाख विद्यार्थी व त्यांना शिकवणारे १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. भारतातील ३० कोटी विद्यार्थ्यांनी घरी बसणे हे एक कोरोनाकाळात निर्माण झालेले मोठे संकट आहे. या बाबीकडेही शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आज शासनाच्या शालेय शिक्षण विभागाबरोबरच खाजगी संस्थांनी देखील दृक-श्राव्य माध्यमाद्वारे शिक्षण (On line Education) देणे सुरू केले आहे. आजच्या घडीला भारताची एकूण लोकसंख्या १३६ कोटी इतकी मोठी असून त्यापैकी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ५३ कोटी ८४ लाख (४०%) इतकी आहे. तर इंटरनेटसह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या ४० कोटी ७२ लाख (२९.९४%) आहे. त्यामुळे माहिती व तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड विषमता आहे. हे पुढील आकडेवारीवरून आपल्या लक्षात येते. आजही ८२ कोटी १६ लाख (६०%) जनता इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे. ग्रामीण भागात ८९ कोटी १२ लाख जनता रहाते त्यापैकी ६० कोटी ६० लाख (६८%) जनता इंटरनेटचा वापर करू शकत नाही किंवा त्यांच्यापर्यंत इंटरनेटच्या सोयी-सुविधा पोहोचलेल्या नाहीत. शहरी भागाचा विचार केला तर ४६ कोटी ८८ लाख जनता शहरात रहाते. त्यापैकी २१ कोटी ५६ लाख (४६%) जनतेला इंटरनेट सुविधेचा लाभ मिळू शकत नाही. एकट्या महाराष्ट्राचा विचार केला तर एकूण लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त लोकांना इंटरनेटचा लाभ मिळत नाही. त्यामुळे दृक-श्राव्य माध्यमाद्वारे मिळणाऱ्या शिक्षणापासून (On line Education) हे विद्यार्थी वंचित रहात आहेत.

आज १०वी-१२वीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून शासनाने परीक्षाच रद्द केल्या. परंतु शैक्षणिक नुकसान टाळणे म्हणजे केवळ परीक्षा पुढे ढकलणे किंवा रद्द करणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. तशा उपाययोजना केल्या गेल्या पाहिजे मात्र सध्या शिक्षणविषयक शासन निर्णय व परिपत्रके काढून केवळ सूचना दिल्या जात आहेत आणि त्यात सातत्याने बदल केले जात आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण

झाली आहे. ग्रामीण भागातील स्थिती शहरापेक्षा अधिक भयावह आहे. गरीब, आदिवासी, भटक्या-विमुक्त व कष्टकरी जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शासनाने निर्णय घेतले गेले पाहिजे त्याची अंमलबजावणी कोरोना काळात जिल्हा स्तरावर झाली पाहिजे. कारण कोरोना काळात जिल्हा हे केंद्र झाले आहे. प्रत्येक जिल्ह्याची स्थिती निरनिराळी आहे. शाळा बंदच्या काळात या घटकांचे शिक्षण अखंडपणे कसे सुरू राहील याची योजना केंद्र व राज्यांनी तातडीने आखली पाहिजे, परंतु तसे होताना दिसत नाही. शिक्षणाबाबत केंद्र व राज्य सरकार तेवढे तत्पर दिसत नाही.

कोरोना पूर्व काळाचा विचार केला तर केंद्र व राज्य सरकारने नेहमीच शिक्षण क्षेत्राकडे कमालीचे दुर्लक्ष केले आहे. वर्ष २००९ मध्ये शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाल्यानंतर सरकारची शिक्षणाबाबतची उदासिनता दूर होईल असे वाटले होते. मात्र गेल्या १० वर्षांतील परिस्थिती पाहता त्यामध्ये काडीमात्र ही सुधारणा झोलेली नाही. जून, २०२० मध्ये 'सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च' या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात, विविध राज्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे किती खर्च करते याची माहिती प्रसिद्ध केली. त्यानुसार, वर्ष २०१७-१८ मध्ये हिमाचल प्रदेश सरकारने ५९ हजार ४४९ रुपये, तामिळनाडू ३६ हजार १६८ रुपये, राजस्थान ३० हजार ६९५ रुपये खर्च केले तर महाराष्ट्र सरकारने केवळ २५ हजार ५०० रुपये खर्च केले होते. हा खर्च हिमाचल प्रदेशच्या निम्माही नाही. यावरून महाराष्ट्रातील सरकार शिक्षणाबाबत किती गंभीर आहे, याची कल्पना येते.

कोरोना पूर्व काळात आणि कोरोना काळात राज्याची शिक्षणविषयक प्रगती कशी राहिली शिक्षणावरील खर्च व शिक्षणविषयक योजनांची अंमलबजावणी कशी आहे, हे अभ्यासण्याचा प्रयत्न सदर वार्तापत्रात केला आहे. त्यामध्ये मागील ९ वर्षांत  स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत शिक्षण विभागावर किती खर्च करण्यात आला. देशात वर्ष १९६८ पासून ते वर्ष २०१९ पर्यंत जे शिक्षणविषयक धोरण आखले गेले, त्या धोरण ठरवणाऱ्या तज्ज्ञांनी नेहमीच शिक्षणावरील खर्च 'सकल राष्ट्रीय उत्पन्ना'च्या किमान ६% असावा अशी शिफारस केली आहे. मात्र या शिफारशीची कोणत्याच सरकारने अंमलबजावणी केलेली नाही. सध्या राष्ट्रीय पातळीवर शिक्षणावरील खर्च 'सकल राष्ट्रीय उत्पन्ना'च्या ३% आहे. तर महाराष्ट्रात 'स्थूल राज्य उत्पन्ना'च्या तुलनेत तो २% ही नाही. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून 'सर्व शिक्षा अभियान', 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' व 'शिक्षक शिक्षण' या तीन योजना समायोजित करून पूर्व शालेय शिक्षणापासून उच्च माध्यमिक पर्यंत सर्वसमावेशक व दर्जेदार शिक्षणासाठी 'समग्र शिक्षा' ही नवीन एकात्मिक योजना राज्यात राबविली जात आहे. मात्र या महत्त्वाच्या योजनेचा निम्म्यापेक्षा जास्त निधी अखर्चित राहिला आहे. तीच स्थीती दिव्यांग, पोषण आहार व विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या इतर योजनांची आहे.

कोरोना काळात राज्यात दि. १ एप्रिल ते १० एप्रिल, २०२१ दरम्यान शाळाबाह्य मुलांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष शोध मोहीम राबविली गेली, वर्ष २०१८ नंतर प्रथमच ही शोध मोहीम राबविली गेली आहे. कोरोना काळात अशी शोध मोहीम राबविण्याचे धाडस दाखवले याबद्दल या सरकारचे अभिनंदन आहे. परंतु या शोध मोहिमेतून पुढे आलेली आकडेवारी अनेक प्रश्न निर्माण करते. या शोध मोहिमेत २५ हजार २०३ शाळाबाह्य मुले सापडली, राज्यातील शाळाबाह्य मुलांचे वास्तव पाहता व या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था-संघटनांनी नोंदविलेल्या प्रतिक्रिया विचारात घेता, शाळाबाह्य मुलांची ही शोध मोहीम घाई-घाईत व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोपस्कार म्हणून करण्यात आली का असा प्रश्न निर्माण होतो. राज्यात आज भटके-विमुक्तांची संख्या दीड कोटीपेक्षा अधिक आहे. या शोध मोहिमेत त्यांच्या मुलांचे काय झाले? हे या आकडेवारीतून दिसत नाही. त्यासोबत ऊसतोड कामगार, वीटभट्टी, दगड खाणीवर काम करणारे कामगार यांच्या मुलांचे काय झाले. अशा किती मुलांचे सर्वेक्षण ही मंडळी काम करीत असलेल्या ठिकाणी जाऊन करण्यात आले, याचा किंचितही उल्लेख या अहवालात नाही. असे अनेक प्रश्न या शोध मोहिमेत अनिर्णित राहिले आहेत. त्यामुळे ही शोध मोहीम म्हणजे फार्स होता का असा प्रश्न निर्माण होतो. या शोध मोहिमेतून एक गोष्ट समोर आली ती म्हणजे शाळा बंद असल्यामुळे इयत्ता १ली ते १२वी मध्ये शिकणारी महाराष्ट्रातील ७६ लाख ७७ हजार ५४३ मुले ही कोरोना काळात नव्याने शाळाबाह्यच झाली आहेत. त्याच वेळेला राज्यातील एक शिक्षकी शाळांचा आकडा बोलका आहे. स्वातंत्र्याच्या ७४ वर्षांनंतरही ३ हजार ४६६ शाळा या एक शिक्षकी आहेत. त्यापैकी ३ हजार १९० शाळा या शासनाच्या आहेत. कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड व पालघर या ४ जिल्ह्यात शेकडा १० शाळा एकशिक्षकी आहेत. तर पुणे, कोल्हापूर, सातारा, गडचिरोली व यवतमाळ हे जिल्हे एक शिक्षकी शाळांच्या आकडेवारीत आघाडीवर आहेत.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयाच्या 'यु डायस प्लस'कडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार वर्ष २०१८-१९ मध्ये महाराष्ट्रातील शाळांमधून इयत्ता १ली ते ११वी मधील ७ लाख ३६ हजार मुलांची गळती झाली आहे. या गळतीचा सामाजिक गटनिहाय विचार केला तर इतर मागास वर्गातील ३ लाख ३७ हजार १७१ विद्यार्थी, अनुसूचित जमातीचे १ लाख २९ हजार विद्यार्थी, अनुसूचित जातीचे ९६ हजार ९५६ विद्यार्थी तर सर्वसाधारण गटातील १ लाख ७३ हजार ३७४ विद्यार्थ्यांची शाळांमधून गळती झाल्याचे आकडेवारी सांगते.

'सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क' कायदा, २००९ अंमलात येऊन आज १० वर्षे उलटून गेली परंतु या कायद्याची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे होताना दिसत नाही. याविषयी प्राप्त झालेली माहिती अधिक भयावह आहे. राज्यात आजच्या घडीला शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या मिळून १ लाख ९ हजार ९४२ शाळा आहेत. शाळेसाठी इमारत, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली, प्रत्येक शिक्षकासाठी वर्ग खोली, शाळेत अपंग विद्यार्थ्यांसाठी उतरंड, मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र

प्रसाधन गृह, पिण्याच्या पाण्याची सोय, मुलांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनासाठी स्वयंपाकगृह, शाळेला संरक्षक भिंत तसेच मुलांसाठी खेळांचे मैदान हे १० निकष प्रत्येक शाळेने पूर्ण करणे गरजेचे होते. मात्र सदर निकष पूर्ण करण्यात केवळ ३८ हजार ४४७ शाळा (३५%) यशस्वी झाल्या असून ७१ हजार ४९५ शाळा निकष पूर्ण करण्यात अपयशी ठरल्या आहेत. निकष पूर्ण न करू शकणाऱ्या शाळांचे प्रमाण (६५%) एवढे मोठे आहे.

कोरोना पूर्व काळ व कोरोना काळातील राज्याच्या शिक्षणविषयक प्रगतीचा आढवा घेण्याचा प्रयत्न जून, २०२१च्या वार्तापत्रात आपण केला आहे. त्यासाठी युनेस्कोने जून, २०२० मध्ये जाहीर केलेला 'शिक्षण विषयक अहवाल', 'शालेय शिक्षण विभागाचा अर्थसंकल्प', 'वित्तविषयक विवरण पत्र', 'इंटरनेट ॲण्ड मोबाईल असोशिएशन्स ऑफ इंडियाचा (IAMAI) अहवाल', 'सेंटर पॉलिसी रिसर्चचा (CPI-State Education Finance) शिक्षणावरील अहवाल', 'संक्षिप्त अर्थसंकल्प' (Budget In Brief), केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालयाच्या 'यु डायस प्लस'चा, शिक्षणविषयक अहवाल, 'प्राथमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केलेला, शाळाबाह्य मुलांच्या शोध मोहिमेचा दि. २३ एप्रिल, २०२१चा अहवाल' तसेच 'समर्थन'ला माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेली शिक्षणविषयक माहितीचा उपयोग यासाठी करण्यात आला आहे. मागील महिन्याच्या वार्तापत्राप्रमाणे याही वार्तापत्राला चांगला प्रतिसाद द्याल ही अपेक्षा आहे.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहितीपूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थ तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे.

धन्यवाद.

**संपर्क व प्रतिक्रिया:** ——————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

——————————————————————————————————

# ३३ जिल्ह्यातून शासनाने शोधली केवळ २५ हजार शाळाबाह्य मुले

## तर ३ ते १८ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या २ लाख ४१ हजार

प्राथमिक शिक्षण संचालनालयाने, दि. १ एप्रिल ते १० एप्रिल, २०२१ या १० दिवसाच्या कालावधीमध्ये शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष शोध मोहीम आयोजित केली होती. त्यामध्ये २५ हजार २०३ शाळाबाह्य मुले आढळून आली. त्यापैकी १० हजार १७७ (४०.३८%) मुले ही एकट्या मुंबई उपनगरातील आहेत. त्यामध्ये १३ हजार ८४ मुले तर १२ हजार १२१ मुलींचा समावेश आहे. त्यापैकी १७ हजार ३९७ मुले ही अनियमित उपस्थितीमुळे शाळाबाह्य झाली होती, तर ७ हजार ८०६ मुले ही कधीच शाळेत गेली नव्हती.

३ ते १८ वयोगटातील १ कोटी ७१ लाख २५ हजार ४५० मुलांची मोजणी झाली. त्यापैकी १ कोटी ६८ लाख ८४ हजार ३१५ मुलांची शाळेत पटनोंदणी करण्यात आली होती. तर २ लाख ४१ हजार १३५ मुलांना शाळेत दाखल केले गेले नव्हते. शाळेत दाखल न केलेल्या मुलांपैकी नाशिक, चंद्रपूर, यवतमाळ, अहमदनगर व पुणे या ५ जिल्ह्यातील मुलांची संख्या १ लाख ६३ हजार ५४१ (६७.८२%) एवढी मोठी आहे. कोविड-१९ काळात ७६ लाख ७७ हजार ५४३ मुले शाळेत जाऊ शकली नाही असा हा अहवाल सांगतो. राज्याबाहेर स्थलांतर करून गेलेल्या मुलांची संख्या ६६ हजार ७४० एवढी आहे. त्याच वेळेला राज्यात इतर राज्यातून स्थलांतर करून आलेल्या मुलांची संख्या ६७ हजार १८० इतकी आहे.

राज्यात एकूण ३६ जिल्हे असून त्यापैकी औरंगाबाद, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातील शिक्षण अधिकाऱ्यांनी शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण केलेले नाही.

### १) ३ ते १८ वयोगटातील एकूण बालके त्यापैकी शाळेत दाखल झालेली व दाखल न होऊ शकलेली बालके, तसेच कोरोनामुळे शाळेत जाऊ न शकणारी बालके:

तक्ता क्र. १

| अक्र | जिल्हा | ३ ते १८ वयोगटातील बालके | ३ ते १८ वयोगटातील शाळेत दाखल बालके | ३ ते १८ वयोगटातील शाळेत दाखल न झालेल्या बालकांची संख्या | शाळेत दाखल न होऊ शकलेल्या बालकांचे प्रमाण | कोविड -परिस्थिती मुळे शाळेत जाऊ न शकणारी बालके (इ. १ली ते १२वी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई उपनगर | ८२४८७४ | ८२२९४८ | १९२६ | ०.२३ | ७२७३२५ |
| २. | मुंबई | १५१०४ | ११२२६ | ३९७८ | २६.३४ | १०८५३ |
| ३. | ठाणे | ३४१७५० | ३४१२६१ | ४८९ | ०.१४ | १३१०९७ |
| ४. | रायगड | ४८३९९८ | ४८३९७८ | २० | ०.०० | ११५०९८ |
| ५. | पालघर | ६७६१७२ | ६७०९९१ | ५१८१ | ०.७७ | २४४९४२ |
| ६. | पुणे | १३४३५४२ | १३१७१४० | २६४०२ | १.९७ | ४४१५६६ |
| ७. | अहमदनगर | ९६०१५५ | ९३२१२२ | २८०३३ | २.९२ | २६५०८६ |
| ८. | सोलापूर | ९२२९७५ | ९२२७९१ | १८४ | ०.०१ | ६७२५१९ |

| अक्र | जिल्हा | ३ ते १८ वयोगटातील बालके | ३ ते १८ वयोगटातील शाळेत दाखल बालके | ३ ते १८ वयोगटातील शाळेत दाखल न झालेल्या बालकांची संख्या | शाळेत दाखल न होऊ शकलेल्या बालकांचे प्रमाण | कोविड -परिस्थिती मुळे शाळेत जाऊ न शकणारी बालके (इ. १ली ते १२वी) |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | कोल्हापूर | ७१०९३५ | ७०५७५३ | ५१८२ | ०.७३ | १८९५४८ |
| १०. | सातारा | ५३६३०५ | ५३३२३४ | ३०७१ | ०.५७ | १९५४५० |
| ११. | सांगली | ५७७३२७ | ५७७१९९ | १२८ | ०.०२ | १३३६७४ |
| १२. | रत्नागिरी | २५७८७९ | २५५८३७ | २०४२ | ०.७९ | २४३८९ |
| १३. | सिंधुदूर्ग | १२५७२१ | १२५१४० | ५८१ | ०.४६ | २०७४३ |
| १४. | नाशिक | १४१८८०५ | १३७७०३८ | ४१७६७ | २.९४ | २९५९४७ |
| १५. | धुळे | ४६३०९९ | ४६२०२० | १०७९ | ०.२३ | २४७२६१ |
| १६. | नंदुरबार | ४७१२८९ | ४६५६२० | ५६६९ | १.२० | २६६२५ |
| १७. | जळगाव | ९४१७०७ | ९३८२४६ | ३४६१ | ०.३७ | ७०२०३८ |
| १८. | जालना | ३७१६०० | ३७१५८८ | १२ | ०.०० | १७७९९४ |
| १९. | बीड | ५५८४९८ | ५५४१८९ | ४३०९ | ०.७७ | २६२३३६ |
| २०. | परभणी | ३४९५८६ | ३४३२३६ | ६३५० | १.८२ | १८७०१० |
| २१. | हिंगोली | २९२५५३ | २८५३७२ | ७१८१ | २.४५ | १३५२९९ |
| २२. | लातूर | ४८११२१ | ४७५७४८ | ५३७३ | १.१२ | १३७६९२ |
| २३. | उस्मानाबाद | ३५५८७१ | ३५५६०८ | २६३ | ०.०७ | २२४८९० |
| २४. | नांदेड | ७१५४५४ | ७०७७३० | ७७२४ | १.०८ | २१५६४८ |
| २५. | अकोला | २८३६५९ | २८२६८० | ९७९ | ०.३५ | २१७१२५ |
| २६. | वाशिम | २६०८८८ | २५८७८९ | २०९९ | ०.८० | २०३९२१ |
| २७. | यवतमाळ | ५६८४५५ | ५४०३७७ | २८०७८ | ४.९४ | ४१२२७९ |
| २८. | नागपूर | ४११९१७ | ४११६७८ | २३९ | ०.०६ | ५२००६५ |
| २९. | भंडारा | २४४४३२ | २४४४०३ | २९ | ०.०१ | ११९४०४ |
| ३०. | गोंदिया | २७००३३ | २६२९७८ | ७०५५ | २.६१ | ६७४६७ |
| ३१. | चंद्रपूर | ४०९२१३ | ३६९९५२ | ३९२६१ | ९.५९ | १२६५९४ |
| ३२. | गडचिरोली | २४४४९३ | २४३१८९ | १३०४ | ०.५३ | ४४७४८ |
| ३३. | वर्धा | २३६०४० | २३४३५४ | १६८६ | ०.७१ | १८०९१० |
| | एकूण | १७१२५४५० | १६८८४३१५ | २४११३५ | १.४० | ७६७७५४३ |

*(स्त्रोत: शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे दि. २४ एप्रिल, २०२१ रोजी प्राप्त माहिती)*

टीप: औरंगाबाद, अमरावती व बुलढाणा या जिल्ह्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

☞ राज्यात वर्ष २०२०-२१ या कालावधीत वय वर्षे ३ ते १८ वयोगटातील १ कोटी ७१ लाख २५ हजार ४५० बालके होती, त्यापैकी १ कोटी ६८ लाख ८४ हजार ३१५ बालके शाळेत दाखल झाली होती, तर २ लाख ४१ हजार १३५ (१.४०%) बालके ही शाळाबाह्य होती.

☞ वय वर्षे ३ ते १८ वयोगटातील नाशिक-४१ हजार ७६७, चंद्रपूर-३९ हजार २६१, यवतमाळ-२८ हजार ७८, अहमदनगर-२८ हजार ३३ तर पुणे जिल्ह्यात २६ हजार ४०२ अशी एकूण १ लाख ६३ हजार ५४१ बालकांना शाळेत दाखल केले गेले नव्हते. राज्यातील दाखल न केलेल्या एकूण २ लाख ४१ हजार १३५ बालकांच्या तुलनेत ही संख्या ६७.८२% होती.

☞ राज्यात कोविड-१९ काळात इयत्ता १ली ते १२वी इयत्तेतील ७६ लाख ७७ हजार ५४३ विद्यार्थी शाळेत जाऊ शकलेले नाहीत.

☞ कोविड-१९ काळात शाळेत जाऊ न शकलेल्या इयत्ता १ली ते १२वी च्या ७६ लाख ७७ हजार ५४३ विद्यार्थ्यांपैकी सर्वात जास्त विद्यार्थी हे मुंबई उपनगर, जळगाव, सोलापूर, नागपूर व यवतमाळ जिल्ह्यातले.

## २)शासनाच्या सर्वेक्षणांती सापडलेली राज्यातील शाळाबाह्य बालके, (२०२१-२२):

**तक्ता क्र. २**

| अक्र | जिल्हा | कधीच शाळेत न गेलेली | | | अनियमित उपस्थितीमुळे शाळाबाह्य | | | एकूण शाळाबाह्य बालके | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १. | मुंबई उपनगर | ८७ | ९५ | १८२ | ५१८८ | ४८०७ | ९९९५ | ५२७५ | ४९०२ | १०१७७ |
| २. | मुंबई | १३४ | १०१ | २३५ | २३७ | १७१ | ४०८ | ३७१ | २७२ | ६४३ |
| ३. | ठाणे | २२ | २६ | ४८ | १३६ | १३९ | २७५ | १५८ | १६५ | ३२३ |
| ४. | रायगड | ११ | ९ | २० | २३ | २२ | ४५ | ३४ | ३१ | ६५ |
| ५. | पालघर | २८९ | ३०१ | ५९० | ८२६ | ८६९ | १६९५ | १११५ | ११७० | २२८५ |
| ६. | पुणे | १३६३ | १११० | २४७३ | ४२१ | ३८४ | ८०५ | १७८४ | १४९४ | ३२७८ |
| ७. | सोलापूर | १०१ | ८४ | १८५ | ३५ | २९ | ६४ | १३६ | ११३ | २४९ |
| ८. | अहमदनगर | ७५ | ६६ | १४१ | १६७ | १५५ | ३२२ | २४२ | २२१ | ४६३ |
| ९. | कोल्हापूर | १८ | ९ | २७ | ३९ | ३५ | ७४ | ५७ | ४४ | १०१ |
| १०. | सातारा | २७ | ३७ | ६४ | ६८ | ५२ | १२० | ९५ | ८९ | १८४ |
| ११. | सांगली | ४० | २२ | ६२ | ३८ | २८ | ६६ | ७८ | ५० | १२८ |
| १२. | रत्नागिरी | १५ | १७ | ३२ | ३० | २७ | ५७ | ४५ | ४४ | ८९ |
| १३. | सिंधुदूर्ग | २६ | २३ | ४९ | ५७ | ४६ | १०३ | ८३ | ६९ | १५२ |
| १४. | नाशिक | ४७८ | ३७९ | ८५७ | ५३२ | ४७८ | १०१० | १०१० | ८५७ | १८६७ |
| १५. | धुळे | ७५ | ८० | १५५ | ९ | ६ | १५ | ८४ | ८६ | १७० |
| १६. | नंदुरबार | ३३६ | ४५१ | ७८७ | २५३ | २७६ | ५२९ | ५८९ | ७२७ | १३१६ |
| १७. | जळगाव | २८७ | २७२ | ५५९ | ७९ | ८० | १५९ | ३६६ | ३५२ | ७१८ |
| १८. | जालना | १४ | १७ | ३१ | २० | २० | ४० | ३४ | ३७ | ७१ |
| १९. | बीड | ३४ | १९ | ५३ | ११८ | १५१ | २६९ | १५२ | १७० | ३२२ |
| २० | परभणी | ३५ | २३ | ५८ | ३८ | २३ | ६१ | ७३ | ४६ | ११९ |
| २१. | हिंगोली | २५ | १३ | ३८ | ३७ | २६ | ६३ | ६२ | ३९ | १०१ |
| २२. | लातूर | ३ | ५ | ८ | १२ | १२ | २४ | १५ | १९ | ३२ |
| २३. | उस्मानाबाद | २ | १० | १२ | १२ | १५ | २७ | १४ | २५ | ३९ |
| २४. | नांदेड | २४ | २१ | ४५ | ६२ | ५३ | ११५ | ८६ | ७४ | १६० |
| २५. | अकोला | ४२० | ३७१ | ७९१ | १४३ | १३० | २७३ | ५६३ | ५०१ | १०६४ |
| २६. | वाशिम | ४ | २ | ६ | ५ | २ | ७ | ९ | ४ | १३ |

| अक्र | जिल्हा | कधीच शाळेत न गेलेली | | | अनियमित उपस्थितीमुळे शाळाबाह्य | | | एकूण शाळाबाह्य बालके | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| २७. | यवतमाळ | २१ | २० | ४१ | ७२ | ५४ | १२६ | ९३ | ७४ | १६७ |
| २८. | नागपूर | ३५ | ३६ | ७१ | ९६ | ७२ | १६८ | १३१ | १०८ | २३९ |
| २९. | भंडारा | २ | ४ | ६ | ८ | ५ | १३ | १० | ९ | १९ |
| ३०. | गोंदिया | ९ | १० | १९ | ३४ | ३५ | ६९ | ४३ | ४५ | ८८ |
| ३१. | चंद्रपूर | २४ | १८ | ४२ | ४० | २५ | ६५ | ६[illegible] | ४३ | १०७ |
| ३२. | गडचिरोली | ४ | १५ | १९ | १३० | १२८ | २५८ | १३४ | १४३ | २७७ |
| ३३. | वर्धा | ३६ | ६४ | १०० | ४३ | ३४ | ७७ | ७९ | ९८ | १७७ |
| | एकूण | ४०७६ | ३७३० | ७८०६ | ९००८ | ८३८९ | १७३९७ | १३०८४ | १२१२१ | २५२०३ |

*(स्त्रोत: शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे दि. २४ एप्रिल, २०२१ रोजी प्राप्त माहिती)*

टीप: सर्वेक्षणाचा कालावधी दि. १ एप्रिल ते १० एप्रिल, २०२१, औरंगाबाद, अमरावती व बुलढाणा या जिल्ह्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

☞ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले असता २५ हजार २०३ शाळाबाह्य बालके सापडली. त्यापैकी १३ हजार ८४ (५१.९१%) मुले तर १२ हजार १२१ (४८.०९%) मुली होत्या.

☞ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये जी २५ हजार २०३ शाळाबाह्य बालके सापडली त्यापैकी ७ हजार ८०६ (३०.९७%) बालके ही कधीच शाळेत गेली नव्हती. तर १७ हजार ३९७ (६९.०३%) बालके ही शाळेमध्ये अनियमित उपस्थिती असणारी होती.

☞ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये जी २५ हजार २०३ शाळाबाह्य बालके सापडली, त्यापैकी १० हजार १७७ (४०.३८%) बालके ही एकट्या मुंबई उपनगरातील होती.

☞ मुंबई उपनगर जिल्ह्यात सापडलेली १०हजार १७७ शाळाबाह्य बालकांपैकी अनियमित उपस्थिती असणारे ९ हजार ९९५ (९८.२१%) होती. तर कधीच शाळेत न गेलेली १८२ (१.७९%) बालके होती.

☞ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये कधीच शाळेत न गेलेली ७ हजार ८०६ शाळाबाह्य बालके सापडली असून त्यापैकी २ हजार ४७३ (३१.६८%) बालके ही एकट्या सोलापूर जिल्ह्यातील आहेत.

☞ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये २५ हजार २०३ शाळाबाह्य बालके सापडली असून त्यापैकी १५ हजार ७४० (६२.४५%) बालके ही मुंबई उपनगर, पुणे व पालघर जिल्ह्यातील आहेत.

☞ सर्वात जास्त शाळाबाह्य मुले ही मुंबई उपनगर-१० हजार १७७ (४०.३८%), पुणे-३ हजार २७८ (१३.००%) तर पालघर जिल्ह्यात २ हजार २८५ (९.०७%) बालके सापडली आहेत.

***

# राज्यात ३ हजार ४६६ शाळा एक शिक्षकी

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात १ लाख ९ हजार ९४२ शाळा असून राज्यात ३ हजार ४६६ शाळा एकशिक्षकी आहेत. तर ३ हजार १९० शाळा या शासनाच्या तर २७६ शाळा या खाजगी आहेत.

३ हजार ४६६ एकशिक्षकी शाळांपैकी रत्नागिरी, पुणे, सिंधुदूर्ग, रायगड, पालघर, सातारा, गडचिरोली, यवतमाळ व कोल्हापूर जिल्ह्यातील २ हजार २४४ (६४.७४%) आहेत. रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड व पालघर या ४ कोकणातील जिल्ह्यांमध्ये एकशिक्षकी शाळांचे प्रमाण एकूण शाळांच्या तुलनेत ९% पेक्षा जास्त आहे. राज्यातील शाळांमधून २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ विद्यार्थी शिक्षण घेत असून ७ लाख ७० हजार १२५ शिक्षक कार्यरत आहेत. विद्यार्थी शिक्षक प्रमाण २९.०३ इतके आहे, तर शाळांमधून ७ लाख २८ हजार ८२५ वर्गखोल्या उपलब्ध असून विद्यार्थी-वर्गखोल्यांचे प्रमाण ३०.६७ इतके आहे.

## १) राज्यातील जिल्हानिहाय शाळा, त्यापैकी एक शिक्षकी शाळांचे प्रमाण (२०१९-२०):

**तक्ता क्र. ३**

| अक्र | जिल्हा | एकूण शाळा | एक शिक्षकी शाळा | | | | जिल्ह्यातील एकूण शाळेत एक शिक्षकी शाळांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासन | अनुदानित | विनाअनुदानित | एकूण | |
| १. | नंदुरबार | २०५५ | २० | १ | ० | २१ | १.०२ |
| २. | धुळे | २००६ | ७ | १ | ३ | ११ | ०.५५ |
| ३. | जळगाव | ३३७६ | २४ | ० | ४ | २८ | ०.८३ |
| ४. | बुलढाणा | २४७४ | ३१ | २ | ४ | ३७ | १.५० |
| ५. | अकोला | १८६५ | ७ | १ | ५ | १३ | ०.७० |
| ६. | वाशिम | १३८५ | २३ | ० | २ | २५ | १.८१ |
| ७. | अमरावती | २८९४ | ३८ | ६ | २ | ४६ | १.५९ |
| ८. | वर्धा | १५१३ | ४७ | २ | १ | ५० | ३.३० |
| ९. | नागपूर | ४११७ | ७९ | ९ | ५ | ९३ | २.२६ |
| १०. | भंडारा | १३२० | ३५ | ० | २ | ३७ | २.८० |
| ११. | गोंदिया | १६६५ | २२ | १ | ० | २३ | १.३८ |
| **१२.** | **गडचिरोली** | **२०६२** | **१३३** | **२** | **०** | **१३५** | **६.५४** |
| १३. | चंद्रपूर | २५०७ | २८ | १ | ५ | ३४ | १.३६ |
| **१४.** | **यवतमाळ** | **३३४८** | **२०१** | **१** | **३** | **२०५** | **६.१२** |
| १५. | नांदेड | ३७२९ | ११७ | ३ | ६ | १२६ | ३.३८ |
| १६. | हिंगोली | १३१५ | ८ | ० | ३ | ११ | ०.८४ |
| १७. | परभणी | २१०७ | २४ | २ | ९ | ३५ | १.६६ |
| १८. | जालना | २४४९ | ३१ | १ | ८ | ४० | १.६३ |
| १९. | औरंगाबाद | ४४१२ | ८७ | २ | १७ | १०६ | २.४० |

| अक्र | जिल्हा | एकूण शाळा | एक शिक्षकी शाळा | | | | जिल्ह्यातील एकूण शाळेत एक शिक्षकी शाळांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शासन | अनुदानित | विनाअनुदानित | एकूण | |
| २०. | नाशिक | ५५९८ | ६० | ३ | ८ | ७१ | १.२७ |
| २१. | ठाणे | ४९२९ | १०५ | १२ | १३ | १३० | २.६४ |
| २२. | मुंबई | २५५१ | १३ | २ | ४ | १९ | ०.७४ |
| २३. | मुंबई उपनगर | १७६८ | ० | २१ | १ | २२ | १.२४ |
| २४. | रायगड | २७२२ | २६८ | १ | ४ | २७३ | १०.०३ |
| २५. | पुणे | ७४२० | २०६ | ६ | ५ | २१७ | २.९२ |
| २६. | अहमदनगर | ५३७७ | ७० | २ | ११ | ८३ | १.५४ |
| २७. | बीड | ३७०८ | १० | ० | ३ | १३ | ०.३५ |
| २८. | लातूर | २६९७ | १६ | ३ | ४ | २३ | ०.८५ |
| २९. | उस्मानाबाद | १८४२ | ३ | १ | ९ | १३ | ०.७१ |
| ३०. | सोलापूर | ४७७४ | १३ | ४ | ५ | २२ | ०.४६ |
| ३१. | सातारा | ३८६९ | २६६ | ४ | ३ | २७३ | ७.०६ |
| ३२. | रत्नागिरी | ३२०१ | ३८९ | १ | ६ | ३९६ | १२.३७ |
| ३३. | सिंधुदूर्ग | १७३८ | २०५ | ६ | ३ | २१४ | १२.३१ |
| ३४. | कोल्हापूर | ३७०४ | १८६ | १ | ८ | १९५ | ५.२६ |
| ३५. | सांगली | २९७० | ८४ | १ | ५ | ९० | ३.०३ |
| ३६. | पालघर | ३४७४ | ३३४ | ० | २ | ३३६ | ९.६७ |
| | एकूण | १०९९४२ | ३१९० | १०३ | १७३ | ३४६६ | ३.१५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई, माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, दि. २५ मार्च, २०२१)*

☞ राज्यभरामध्ये एकूण १ लाख ९ हजार ९४२ शाळा असून त्यापैकी, ३ हजार ४६६ (३.१५%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ राज्यभरात ३ हजार ४६६ शाळा एक शिक्षकी असून त्यापैकी रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, सातारा, गडचिरोली, यवतमाळ व कोल्हापूर या ९ जिल्ह्यात २ हजार २४४ (६४.७४%) शाळा एकशिक्षकी आहेत.

☞ रत्नागिरी जिल्ह्यात ३,२०१ शाळा असून, त्यापैकी ३९६ (१२.३७%) शाळा या एकशिक्षकी आहेत.

☞ सिंधुदुर्ग जिल्ह्यात १,७३८ शाळा असून, त्यापैकी २१४ (१२.३१%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ रायगड जिल्ह्यात २,७२२ शाळा असून, त्यापैकी २७३ (१०.०३%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ पालघर जिल्ह्यात ३,४७४ शाळा असून, त्यापैकी ३३६ (९.६७%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ सातारा जिल्ह्यात ३,८६९ शाळा असून, त्यापैकी २७३ (७.०६%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ गडचिरोली जिल्ह्यात २,०६२ शाळा असून, त्यापैकी १३५ (६.५४%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ यवतमाळ जिल्ह्यात ३,३४८ शाळा असून, त्यापैकी २०५ (६.१२%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

☞ कोल्हापूर जिल्ह्यात ३,७०४ शाळा असून, त्यापैकी १९५ (५.२६%) शाळा या एक शिक्षकी आहेत.

## ३) राज्यातील शाळानिहाय विद्यार्थी, शिक्षक व वर्गखोल्यांचे प्रमाण (२०१८-१९):

**तक्ता क्र. ४**

| व्यवस्थापन | शाळा (इ. १ ली ते १२वी) | विद्यार्थी संख्या | शिक्षक | वर्गखोल्या | विद्यार्थी शिक्षक प्रमाण | विद्यार्थी वर्ग - खोल्या प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| शासन व स्था. स्व. संस्था | ६६०३३ | ५६६४२३७ | २५७९३९ | २७२९२० | २१.९६ | २०.७५ |
| खाजगी अनुदानित | २३५५४ | १०६६६८८० | २९८८६० | २४९११४ | ३५.६९ | ४२.८२ |
| खाजगी विना अनुदानित | २०३५५ | ६०२४९१६ | २१३३२६ | २०६७९१ | २८.२४ | २९.१४ |
| **एकूण** | **१०९९४२** | **२२३५६०३३** | **७७०१२५** | **७२८८२५** | **२९.०३** | **३०.६७** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, यु डायस प्लस, २०१८-१९)*

- ☞ वर्ष २०१८-१९ मध्ये १ली ते १२वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या एकूण शाळा या १ लाख ९ हजार ९४२ शाळा असून, विद्यार्थी संख्या २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ इतकी आहे. तर शिक्षकांची संख्या ७ लाख ७० हजार १२५ इतकी आहे.
- ☞ २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ इतकी विद्यार्थी संख्या असून त्यांना शिक्षण देण्यासाठी ७ लाख ७० हजार १२५ शिक्षक उपलब्ध आहेत. विद्यार्थी शिक्षक प्रमाण सरासरी २९.०३% आहे.
- ☞ २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ विद्यार्थ्यांना ७ लाख २८ हजार ८२५ वर्गखोल्या उपलब्ध असून, त्यांचे प्रमाण सरासरी ३०.६७ विद्यार्थ्यांमागे एक वर्ग खोली इतके आहे.
- ☞ १ लाख ९ हजार ९४२ शाळांपैकी ६६ हजार ३३ (६०.०६%) शाळा या शासनाच्या असून, २३ हजार ५५४ (२१.४२%) शाळा या खाजगी अनुदानित आहेत. तर २० हजार ३५५ (१८.५१%) शाळा या खाजगी विनाअनुदानित आहेत.
- ☞ राज्यातील सर्व शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ इतकी असून सर्वात जास्त १ कोटी ६ लाख ६६ हजार ८८० (४७.७१%) विद्यार्थी खाजगी अनुदानित शाळेत शिकत आहेत. तर खाजगी विनाअनुदानित शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६० लाख २४ हजार ९१६ (२६.९५%) इतकी आहे. तर शासन व स्थानिक स्वराज्य संस्थात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांच्या तुलनेत कमी असून, ती ५६ लाख ६४ हजार २३४ (२५.३४) इतकी आहे.
- ☞ राज्यातील १ली ते १२वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २ कोटी २३ लाख ५६ हजार ३३ इतकी असून त्यापैकी १ कोटी ६६ लाख ९१ हजार ७९६ (७४.६६%) विद्यार्थी हे खाजगी शाळांमधून शिक्षण घेत आहेत. तर केवळ ५६ लाख ६४ हजार २३७ (२५.३४%) विद्यार्थी हे शासनाच्या शाळेत शिक्षण घेत आहेत.
- ☞ राज्यातील १ लाख ९ हजार ९४२ शाळांमधून ७ लाख २८ हजार ८२५ वर्गखोल्या उपलब्ध असून त्यापैकी २ लाख ७२ हजार ९२० (३७.४५%) वर्गखोल्या या शासनाच्या शाळेत आहेत. तर खाजगी अनुदानित शाळांतील वर्गखोल्यांची संख्या २ लाख ४९ हजार ११४ (३४.१८%) इतकी असून, खाजगी विनाअनुदानित शाळांतील वर्गखोल्यांची संख्या २ लाख ६ हजार ७९१ (२८.३७%) आहे.

***

# वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात ७ लाख ३६ हजार विद्यार्थ्यांची गळती

## त्यापैकी इतर मागास वर्गातील ३ लाख ३७ हजार तर अनुसूचित जमातीची १ लाख २९ हजार विद्यार्थी

केंद्र शासनाच्या 'यु डायस प्लस' यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी दरम्यान १ कोटी ९६ लाख ८४ हजार ६७५ विद्यार्थ्यांची पटनोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात १ कोटी ८९ लाख ४७ हजार ८०२ विद्यार्थी टिकून राहिले याचाच अर्थ ७ लाख ३६ हजार ८७३ विद्यार्थ्यांची गळती झाली आहे. गळतीचे हे प्रमाण ३.७४% आहे.

गळती झालेल्या ७ लाख ३६ हजार ८७३ विद्यार्थ्यांपैकी सर्वात जास्त गळती ही इयत्ता ९वी ते १०वी मध्ये शिकणाऱ्या मुलांची असून या माध्यमिक स्तरावर ५ लाख १ हजार ४१६ मुलांची गळती झाली, उच्च प्राथमिक स्तरावर १ लाख २६ हजार ९९० मुलांची गळती झाली. तर प्राथमिक श्रेणीतील १ लाख ८ हजार ४६७ विद्यार्थी शाळेतून बाहेर पडले आहेत. सामाजिक गटनिहाय विद्यार्थी गळतीचा विचार केला तर गळती झालेल्या ७ लाख ३६ हजार ८७३ मुलांपैकी ३ लाख ३७ हजार १७१ मुले ही इतर मागास वर्गातील तर १ लाख ७३ हजार ३७४ मुले ही सर्वसाधारण वर्गातील, अनुसूचित जमातीची १ लाख २९ हजार ३७२ विद्यार्थी असून अनुसूचित जातीतील ९६ हजार ९५६ विद्यार्थी आहेत.

विद्यार्थ्यांचे सामाजिक गटनिहाय गळतीचे प्रमाण अभ्यासले असता असे आढळून आले की, विद्यार्थी गळतीचे प्रमाण अनुसूचित जमातीमध्ये सर्वाधिक आहे. अनुसूचित जमातीच्या २२ लाख ६१ हजार ७५४ विद्यार्थ्यांची वर्ष २०१७-१८ मध्ये पट नोंदणी झाली होती. त्यापैकी २१ लाख ३२ हजार ३८२ विद्यार्थी शाळेत टिकून राहिले तर १ लाख २९ हजार ३७२ विद्यार्थ्यांची गळती झाली. याचाच अर्थ ५.७२% विद्यार्थी शाळेच्या प्रवाहातून बाहेर पडले. त्या खालोखाल इतर मागास वर्गातील मुलांचे गळतीचे प्रमाण असून वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात ६६ लाख २६ हजार १२५ विद्यार्थी पटावर होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ६२ लाख ८८ हजार ९५४ विद्यार्थी शाळेत टिकून होते. तर ३ लाख ३७ हजार १७१ मुले शाळेच्या प्रवाहाबाहेर गेले. इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे हे प्रमाण ५.०८% इतके आहे. अनुसूचित जातीतील ९६ हजार ९५६ मुलांची गळती झाली असून त्याचे प्रमाण ३.७६% इतके आहे. तर सर्वसाधारण गटात १ लाख ७३ हजार ३७४ मुलांची गळती झाली असून गळतीचे प्रमाण २.११% राहिले आहे.

## १) जातीनिहाय व श्रेणीनिहाय विद्यार्थी व गळतीचे प्रमाण, प्राथमिक (२०१८-१९):

**तक्ता क्र. ५**

| सामाजिक गट | मागील वर्षातील पट नोंदणी (इ. १ली ते ५वी) | प्राथमिक (शैक्षणिक वर्ष २०१८-१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पट नोंदणी (इ.२री ते ६वी) | पुनर्प्रवेशित (इ. १ली ते ५वी) | एकूण पट नोंदणी | गळती | गळतीचे प्रमाण |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| सर्वसाधारण | ४२२८९१८ | ४२२५२९२ | ५७ | ४२२५३४९ | ३५६९ | ०.०८ |
| अनुसूचित जाती | १२७१२५५ | १२६१९८८ | ३९ | १२६२०२७ | ९२२८ | ०.७३ |
| अनुसूचित जमाती | ११९७०९७ | ११८७१४३ | ३ | ११८७१४६ | ९९५१ | ०.८३ |
| इतर मागास वर्ग | ३३१५७३९ | ३२२९८०४ | २१६ | ३२३००२० | ८५७१९ | २.५८ |
| **एकूण** | **१००१३००९** | **९९०४२२७** | **३१५** | **९९०४५४२** | **१०८४६७** | **१.०८** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, यु डायस प्लस, २०१८-१९)*

- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक शाळांमध्ये १ कोटी १३ हजार ९ विद्यार्थी इयत्ता १ली ते ५वीच्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता २री ते ६वीच्या वर्गात ९९ लाख ४ हजार ५४२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर १ लाख ८ हजार ४६७ (१.०८%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये सर्वसाधारण गटातील ४२ लाख २८ हजार ९१८ विद्यार्थी इयत्ता १ली ते ५वीच्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १ली ते ६वी मध्ये ४२ लाख २५ हजार ३४९ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर ३ हजार ५६९ विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये इतर मागास वर्गाचे, इयत्ता १ली ते ५वी मध्ये ३३ लाख १५ हजार ७३९विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ३२ लाख ३० हजार २० विद्यार्थ्यांचे इयत्ता २री ते ६वी च्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ८५ हजार ७१९ (२.५८%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये अनुसूचित जातीतील १२ लाख ७१ हजार २५५ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये १२ लाख ६२ हजार २७ विद्यार्थ्यांचे इयत्ता २री ते ६वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ९ हजार २२८ (०.७३%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये अनुसूचित जमातीतील ११ लाख ९७ हजार ९७ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ११ लाख ८७ हजार १४६ विद्यार्थ्यांचे इयत्ता २री ते ६वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ९ हजार ९५१ (०.८३%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते ५वी मध्ये एकूण ३१५ विद्यार्थ्यांनी पुन्हा प्रवेश घेतला. त्यापैकी २१६ विद्यार्थी हे इतर मागास वर्गातील होते.

## २)जातीनिहाय, श्रेणीनिहाय विद्यार्थी व गळतीचे प्रमाण, उच्च प्राथमिक (२०१८-१९):

**तक्ता क्र. ६**

| सामाजिक गट | मागील वर्षातील पट नोंदणी (इ. ६वी ते ८वी) | उच्च प्राथमिक (शैक्षणिक वर्ष:२०१८-१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पट नोंदणी (इ.७वी ते ९वी) | पुनर्प्रवेशित विद्यार्थी (इ. ६वी ते ८वी) | एकूण पट नोंदणी | गळती | गळतीचे प्रमाण |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| सर्वसाधारण | २४४९९७५ | २४३३०६२ | ९ | २४३३०७१ | १६९०४ | ०.६९ |
| अनुसूचित जाती | ७७८३८६ | ७७०५८७ | ७ | ७७०५९४ | ७७९२ | १.०० |
| अनुसूचित जमाती | ६८६५३४ | ६५३४२६ | ० | ६५३४२६ | ३३१०८ | ४.८२ |
| इतर मागास वर्ग | १९८४४०२ | १९१५२१३ | ३ | १९१५२१६ | ६९१८६ | ३.४९ |
| **एकूण** | **५८९९२९७** | **५७७२२८८** | **१९** | **५७७२३०७** | **१२६९९०** | **२.१५** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, युडायस प्लस, २०१८-१९)*

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक शाळांमध्ये ५८ लाख ९९ हजार २९७ विद्यार्थी इयत्ता ६ली ते ७वीच्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता ७वी ते ९वीच्या वर्गात ५७ लाख ७२ हजार ३०७ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर १ लाख २६ हजार ९९० (२.१५%) विद्यार्थ्यांची गळती झाली.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक शाळांमध्ये सर्वसाधारण गटातील २४ लाख ४९ हजार ९७५ विद्यार्थी इयत्ता ६वी ते ८वी च्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता ७वी ते ९वी मध्ये २४ लाख ३३ हजार ७१ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर १६ हजार ९०४ (०.६९%) विद्यार्थ्यांची गळती झाली.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक शाळांमध्ये इतर मागास वर्गाचे, इयत्ता ६वी ते ८वी मध्ये १९ लाख ८४ हजार ४०२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये १९ लाख १५ हजार २१६ विद्यार्थ्यांची इयत्ता ७वी ते ९वी च्या वर्गात पटनोंदणी झाली. तर ६९ हजार १८६ (३.४९%) विद्यार्थ्यांची गळती झाली.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक शाळांमध्ये अनुसूचित जातीतील इयत्ता ६वी ते ८वी मध्ये ७ लाख ७८ हजार ३८६ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ७ लाख ७० हजार ५९४ विद्यार्थ्यांचे इयत्ता ७वी ते ९वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ७ हजार ७९२ (१.००%) विद्यार्थ्यांची गळती झाली.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक शाळांमध्ये अनुसूचित जमातीतील इयत्ता ६वी ते ८वी मध्ये ६ लाख ८६ हजार ५३४ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ६ लाख ५३ हजार ५२६ विद्यार्थ्यांचे इयत्ता ७वी ते ९वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ३३ हजार १०८ (४.८२%) विद्यार्थ्यांची गळती झाली.

☞ वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात उच्च प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता ६वी ते ८वी मध्ये एकूण १९ विद्यार्थ्यांनी पुन्हा प्रवेश घेतला. त्यापैकी ९ विद्यार्थी हे सर्वसाधारण वर्गातील होते.

## ३)जातीनिहाय व विद्यार्थी गळतीचे प्रमाण, माध्यमिक (२०१८-१९):

**तक्ता क्र. ७**

| सामाजिक गट | मागील वर्षातील पट नोंदणी (इ. ९वी ते १०वी) | माध्यमिक (शैक्षणिक वर्ष:२०१८-१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्प्रवेशित विद्यार्थी (इ. ९वी ते १०वी) | नवीन पट नोंदणी (इ.१०वी ते ११वी) | एकूण पट नोंदणी | गळती | गळतीचे प्रमाण |
| | (१) | (२) | (३) | (३) | (५) | (६) |
| सर्वसाधारण | १५४०१०० | १७८८६ | १३६९३१३ | १३८७१९९ | १५२९०१ | ९.९३ |
| अनुसूचित जाती | ५२८१६२ | ६५६७ | ४४१६५९ | ४४८२२६ | ७९९३६ | १५.१३ |
| अनुसूचित जमाती | ३७८१२३ | ५९२८ | २८५८८२ | २९१८१० | ८६३१३ | २२.८३ |
| इतर मागास वर्ग | १३२५९८४ | १२५७१ | ११३११४७ | ११४३७१८ | १८२२६६ | १३.७५ |
| **एकूण** | **३७७२३६९** | **४२९५२** | **३२२८००१** | **३२७०९५३** | **५०१४१६** | **१३.२९** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, युडायस प्लस, २०१८-१९)*

- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये सर्व माध्यमिक शाळांमध्ये ३७ लाख ७२ हजार ३६९ विद्यार्थी इयत्ता ९वी ते १०वीच्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १०वी ते ११वीच्या वर्गात ३२ लाख २८ हजार १ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर ५ लाख १ हजार ४१६ (१३.२९%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये सर्वसाधारण गटातील १५ लाख ४० हजार १०० विद्यार्थी इयत्ता ९वी ते १०वी च्या वर्गात शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १०वी ते ११वी मध्ये १३ लाख ८७ हजार १९९ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. तर १ लाख ५२ हजार ९०१ (९.९३%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये इतर मागास वर्गाचे, इयत्ता ९वी ते १०वी मध्ये १३ लाख २५ हजार ९८४ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ११ लाख ४३ हजार ७१८ विद्यार्थ्यांची इयत्ता १०वी ते ११वी च्या वर्गात पट नोंदणी झाली. तर १ लाख ८२ हजार २६६ (३.४९%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये अनुसूचित जातीतील इयत्ता ९वी ते १०वी मध्ये ५ लाख २८ हजार १६२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ४ लाख ४८ हजार २२६ विद्यार्थ्यांचे इयत्ता १०वी ते ११वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ७९ हजार ९३६ (१५.१३%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१७-१८ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये अनुसूचित जमातीतील इयत्ता ९वी ते १०वी मध्ये ३ लाख ७८ हजार १२३ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये २ लाख ९८ हजार ११० विद्यार्थ्यांचे इयत्ता १०वी ते ११वीच्या वर्गात पट नोंदणी झाली. तर ८६ हजार ३१३ (२२.८३%) विद्यार्थ्यांची गळती झाली.
- ☞ वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता १०वी ते ११वी मध्ये एकूण ४२ हजार ९५२ विद्यार्थ्यांनी पुन्हा प्रवेश घेतला.

## ४) सामाजिक गटनिहाय व श्रेणीनिहाय विद्यार्थी गळतीचे प्रमाण इ.१ली ते ११वी (२०१८-१९)

**तक्ता क्र. ८**

| श्रेणी | सामाजिक गटनिहाय विद्यार्थी गळती (शैक्षणिक वर्ष २०१८-१९) | | | | | श्रेणीनिहाय प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर मागास वर्ग | एकूण | |
| प्राथमिक | ३५६९ | ९२२८ | ९९५१ | ८५७१९ | **१०८४६७** | १४.७२ |
| उच्च प्राथमिक | १६९०४ | ७७९२ | ३३१०८ | ६९१८६ | **१२६९९०** | १७.२३ |
| माध्यमिक | १५२९०१ | ७९९३६ | ८६३१३ | १८२२६६ | **५०१४१६** | ६८.०५ |
| **एकूण** | **१७३३७४** | **९६९५६** | **१२९३७२** | **३३७१७१** | **७३६८७३** | **१००.००** |
| **सामाजिक गटनिहाय प्रमाण** | **२३.५३** | **१३.१५** | **१७.५६** | **४५.७६** | **१००.००** | **-** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, यु डायस प्लस, २०१८-१९)*

☞ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १ली ते ११वीच्या ७ लाख ३६ हजार विद्यार्थ्यांची गळती झाली असून माध्यमिक श्रेणीतील ५ लाख १ हजार ४१६ (६८.०५%), उच्च प्राथमिक श्रेणीतील १ लाख २६ हजार २९०(१७.२३%), तर प्राथमिक श्रेणीतील १ लाख ८ हजार ४६७ (१४.७२%) विद्यार्थी होते.

☞ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १ली ते ११वीच्या ७ लाख ३६ हजार विद्यार्थ्यांपैकी ३ लाख ३७ हजार १७१ (४५.७६%) विद्यार्थी हे इतर मागास वर्गातील, १ लाख ७३ हजार ३७४ (२३.५३%) सर्वसाधारण गटातील, १ लाख २९ हजार ३७२ (१७.५६%) अनुसूचित जमातीचे तर ९६ हजार ९५६ (१३.१५%) विद्यार्थी हे अनुसूचित जातीचे होते.

## ५)सामाजिक गटनिहाय इ. १ली ते ११वी च्या विद्यार्थ्यांची पटनोंदणी व गळती, (२०१८-१९)

**तक्ता क्र. ९**

| सामाजिक गट | पट नोंदणी इयत्ता १ ली ते १०वी (२०१७-१८) | पट नोंदणी इयत्ता २री ते ११वी (२०१८-१९) | गळती | गळतीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | ८२१८९९३ | ८०४५६१९ | १७३३७४ | २.११ |
| **अनुसूचित जाती** | २५७७८०३ | २४८०८४७ | ९६९५६ | ३.७६ |
| **अनुसूचित जमाती** | २२६१७५४ | २१३२३८२ | १२९३७२ | ५.७२ |
| **इतर मागास वर्ग** | ६६२६१२५ | ६२८८९५४ | ३३७१७१ | ५.०९ |
| **एकूण** | **१९६८४६७५** | **१८९४७८०२** | **७३६८७३** | **३.७४** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, यु डायस प्लस, २०१८-१९)*

☞ वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी मध्ये १ कोटी ९६ लाख ८४ हजार ६७५ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्या तुलनेत वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता

२री ते ११वी मध्ये १ कोटी ८९ लाख ४७ हजार ८०२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली याचाच अर्थ ७ लाख ३६ हजार ८७३ विद्यार्थ्यांची गळती झाली. गळतीचे प्रमाण ३.७४% इतके होते.

☞ वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी इयत्तेत इतर मागास गटातील ६६ लाख २६ हजार १२५ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्या तुलनेत वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक इयत्ता १ली ते ११वी मध्ये ६२ लाख ८८ हजार ९५४ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली याचाच अर्थ ३ लाख ३७ हजार १७१ (५.०९%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी इयत्तेत सर्वसाधारण गटातील ८२ लाख १८ हजार ९९३ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्या तुलनेत वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता २री ते ११वी मध्ये ८० लाख ४५ हजार ६१९ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली याचाच अर्थ १ लाख ७३ हजार ३७४ (२.११%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी इयत्तेत अनुसूचित जमातीतील २२ लाख ६१ हजार ७५४ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्या तुलनेत वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते ११वी मध्ये २१ लाख ३२ हजार ३८२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली याचाच अर्थ १ लाख २९ हजार ३७२ (५.७२%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली ते १०वी इयत्तेत अनुसूचित जातीतील २५ लाख ७७ हजार ८०३ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्या तुलनेत वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता २री ते ११वी मध्ये २४ लाख ८० हजार ८४७ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली याचाच अर्थ ९६ हजार ९५६ (३.७६%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

## ६) श्रेणीनिहाय विद्यार्थी गळतीचे प्रमाण, इयत्ता १ली ते ११वी (२०१८-१९):

**तक्ता क्र.१०**

| श्रेणी | इयत्ता १ली ते ११वी (शैक्षणिक वर्ष २०१८-१९) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मागील वर्षातील पट नोंदणी (वर्ष २०१७-१८) | | चालू वर्षातील पट नोंदणी (वर्ष २०१८-१९) | | गळती | गळतीचे प्रमाण |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| प्राथमिक | इयत्ता १ली ते ५वी | १००१३००९ | इयत्ता २री ते ६वी | ९९०४५४२ | १०८४६७ | ०१.०८ |
| उच्च प्राथमिक | इयत्ता ६वी ते ८वी | ५८९९२९७ | इयत्ता ७वी ते ९वी | ५७७२३०७ | १२६९९० | ०२.१५ |
| माध्यमीक | इयत्ता ९वी ते १०वी | ३७७२३६९ | इयत्ता १०वी ते ११वी | ३२७०९५३ | ५०१४१६ | १३.२९ |
| | **एकूण** | **१९६८४६७५** | **एकूण** | **१८९४७८०२** | **७३६८७३** | **०३.७४** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, यु डायस प्लस, २०१८-१९)*

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमीक श्रेणीतील १ कोटी ९६ लाख ८४ हजार ६७५ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये १ कोटी ८९ लाख ४७

हजार ८०२ (९६.२६%) विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. म्हणजे वर्ष २०१७-१८ मधील एकूण विद्यार्थ्यांपैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ७ लाख ३६ हजार ८७३ (३.७४%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक श्रेणीतील इयत्ता १ली ते ५वी मधील १ कोटी १३ हजार ९ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ९९ लाख ४ हजार ५४२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. म्हणजे वर्ष २०१७-१८ मधील एकूण विद्यार्थ्यांपैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता २री ते ६वी मध्ये १ लाख ८ हजार ४६७ (१.०८%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक श्रेणीतील इयत्ता ६वी ते ८वी मधील ५८ लाख ९९ हजार २९७ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता ७वी ते ९वी मध्ये ९९ लाख ४ हजार ५४२ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. म्हणजे वर्ष २०१७-१८ मधील एकूण विद्यार्थ्यांपैकी वर्ष २०१८-१९ मध्ये १ लाख ८ हजार ४६७ (१.०८%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

☞ वर्ष २०१७-१८ मध्ये माध्यमीक श्रेणीतील इयत्ता ९वी ते १०वी मधील ३७ लाख ७२ हजार ३६९ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली होती. त्यापैकी वर्ष २०१८-१९ मध्ये इयत्ता १०वी ते ११वी मध्ये ३२ लाख ७० हजार ९५३ विद्यार्थ्यांची पट नोंदणी झाली. म्हणजे वर्ष २०१७-१८ मधील एकूण विद्यार्थ्यांपैकी वर्ष २०१८-१९ मध्ये ५ लाख १ हजार ४१६ (१३.२९%) विद्यार्थ्यांची गळती झाली आहे.

***

## राज्यातील १ लाख ९ हजार ९४२ शाळांपैकी ७१ हजार ४९५ शाळा 'शिक्षण हक्क कायद्या'चे निकष पूर्ण करण्यात सपशेल अपयशी

### ६९ हजार ४५४ शाळांना मुख्याध्यापक नाहीत

केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरू होऊन १० वर्षे पूर्ण झाली तरीही राज्यातील १ लाख ९ हजार ९४२ शाळांपैकी ७१ हजार ४९५ शाळा (६५%) शाळा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरल्या आहेत. तर या कायद्यानुसार शाळेसाठी इमारत, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली, शिक्षकांसाठी वर्गखोली, अपंग विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेत उतरंड, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालये, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, मध्यान्ह भोजनासाठी (Mid-Day Meal) स्वतंत्र प्रसाधनगृह, शाळेला संरक्षक भिंत व खेळाचे मैदान हे १० निकष पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र सदर निकष पूर्ण करण्यात केवळ ३८ हजार ४४७ शाळा यशस्वी झाल्या आहेत.

आजही ३१ हजार ५९ शाळांमध्ये मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली नाही. ३० हजार ५३७ शाळांमध्ये मध्यान्ह भोजन तयार करण्यासाठी स्वयंपाकगृह नाही. १८ हजार ७३६ शाळांना संरक्षक भिंत बांधली गेलेली नाही. तर १६ हजार ३६ शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही. ४ हजार ४५६ शाळांमधून मुलींसाठी स्वतंत्र शौचालये बांधलेली नाहीत. तर ३३२ शाळांना इमारत नाही. अशी शाळांची अवस्था आहे. प्रत्येक शाळेला शिस्त लावण्याची, शाळेचे व्यवस्थापन सांभाळायची महत्त्वाची जबाबदारी मुख्याध्यापकाची असते. परंतु आज ६९ हजार ४५४ शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत. त्यापैकी ५४ हजार ५२५ शाळा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आहेत. खुद्द शालेय शिक्षण विभागाच्या ८२ शाळा असून त्यापैकी ४८ शाळांना मुख्याध्यापक लाभलेले नाहीत. अशा शाळांमधून मुलांचा शैक्षणिक विकास कसा होणार हा खरा प्रश्न आहे.

### १) शिक्षणाचा मूलभूत अधिकार, अधिनियम २००९ नुसार १० निकष पूर्ण करणाऱ्या व पूर्ण न करू शकलेल्या राज्यातील शाळा :

**तक्ता क्र. ११**

| अक्र. | निकष | एकूण शाळा - १०९९४२ | | निकष पूर्ण करणाऱ्या शाळांचे प्रमाण | निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | निकष पूर्ण करणाऱ्या शाळा | निकष पूर्ण न करणाऱ्या शाळा | | |
| १. | इमारत | १०९६२० | ३२२ | ९९.७१ | ०.२९ |
| २. | मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली | ७८८८३ | ३१०५९ | ७१.७५ | २८.२५ |
| ३. | प्रत्येक शिक्षकासाठी वर्गखोली | १०९५६८ | ३७४ | ९९.६६ | ०.३४ |
| ४. | उतरंड | ९५२०० | १४७४२ | ८६.५९ | १३.४१ |
| ५. | मुलांसाठी स्वतंत्र शौचालय | १०३५०७ | ६४३५ | ९४.१५ | ५.८५ |
| ६. | मुलींसाठी स्वतंत्र शौचालय | १०५४८६ | ४४५६ | ९५.९५ | ४.०५ |
| ७. | पिण्याच्या पाण्याची उपलब्धता | १०८५८८ | १३५४ | ९८.७७ | १.२३ |
| ८. | स्वयंपाक गृह | ७९४०५ | ३०५३७ | ७२.२२ | २७.७८ |
| ९. | संरक्षक भिंत | ९१२०६ | १८७३६ | ८२.९६ | १७.०४ |
| १०. | खेळाचे मैदान | ९३९०६ | १६०३६ | ८५.४१ | १४.५९ |
| | **१० निकष पूर्ण करणाऱ्या शाळा** | **३८४४७** | **७१४९५** | **३४.९७** | **६५.०३** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, युडायस प्लस, २०१८-१९)*

- ☞ राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या एकूण शाळा १ लाख ९ हजार ९४२ इतक्या आहेत. त्यापैकी ३८ हजार ४४७ (३४.९७%) शाळांनी शिक्षण हक्क कायद्यानुसार १० महत्त्वाचे निकष पूर्ण केले असून, ७१ हजार ४९५ (६५.०३%) शाळांनी निकष पूर्ण केलेले नाहीत.
- ☞ राज्यातील ३१ हजार ५९ (२८.२५%) शाळांमध्ये मुख्यध्यापकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध नाही.
- ☞ राज्यातील ३० हजार ५३७ (२७.७८%) शाळांमध्ये स्वतंत्र स्वयंपाकगृह उपलब्ध नाही.
- ☞ राज्यातील १८ हजार ७३६ (१७.०४%) शाळांना संरक्षक भिंत बांधलेली नाही.
- ☞ १६ हजार ३६ (१४.५९%) शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही.
- ☞ १४ हजार ७४२ (१३.४१%) शाळांमध्ये दिव्यांग मुलांसाठी उतरंड बांधलेली नाही.
- ☞ ६ हजार ४३५ (५.८५%) शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय बांधलेले नाहीत.
- ☞ ४ हजार ४५६ (४.०५%) शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालय बांधलेली नाहीत.
- ☞ १ हजार ३४५ (१.२३%) शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.

**महत्त्वाचे निष्कर्ष:**

- ☞ राज्यातील १ लाख ९ हजार ९४२ शाळांपैकी, ३५ हजार १४१ (३१.९६%) शाळांमध्ये महिला शिक्षिका नाहीत.
- ☞ महिला शिक्षिका नसलेल्या ३५ हजार १४१ शाळांपैकी २६ हजार ५९६ (७५.६८%) शाळा या शासनाच्या आहेत. तर ८ हजार ५४५ (२४.३२%) शाळा या खाजगी स्वरुपाच्या आहेत.
- ☞ राज्यातील १ लाख ९ हजार ९४२ शाळांमध्ये ७ लाख ५८ हजार २२३ शिक्षक असून त्यापैकी ८ हजार १८९ शिक्षकांना प्रशिक्षण मिळालेले नाही.

## २) राज्यातील एकूण शाळांपैकी नियमित मुख्याध्यापक असलेल्या व मुख्याध्यापक नसलेल्या शाळा (२०१८-१९):

**तक्ता क्र. १२**

| अक्र | शाळा व्यवस्थापन | शाळा | नियमिता मुख्याध्यापक असलेल्या शाळा | नियमित मुख्याध्यापक उपलब्ध नसलेल्या शाळा | एकूण शाळांपैकी मुख्याध्यापक नसलेल्या शाळांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | शालेय शिक्षण विभाग | ८२ | ३४ | ४८ | ५८.५४ |
| २. | आदिवासी विकास विभाग | ५२० | ३३३ | १८७ | ३५.९६ |
| ३. | समाज कल्याण विभाग | १२३ | ७२ | ५१ | ४१.४६ |
| ४. | स्थानिक स्वराज्य संस्था | ६५१६२ | १०६३७ | ५४५२५ | ८३.६८ |
| ५. | खाजगी अनुदानित | २३५५४ | १७५७९ | ५९७५ | २५.३७ |
| ६. | खाजगी विनाअनुदानित | १९३७५ | ११२०९ | ८१६६ | ४२.१५ |
| ७. | केंद्रीय विद्यालय | १०६ | ७८ | २८ | २६.४२ |
| ८. | जवाहर नवोदय विद्यालय | ३३ | २७ | ६ | १८.१८ |
| ९. | सैनिकी शाळा | ३० | ० | ३० | १००.०० |
| १०. | रेल्वे शाळा | ६ | ४ | २ | ३३.३३ |
| ११. | मदरसा | १५४ | ४१ | ११३ | ७३.३८ |
| १२. | इतर शाळा | ७९७ | ४७४ | ३२३ | ४०.५३ |
| | **एकूण** | **१०९९४२** | **४०४८८** | **६९४५४** | **६३.१७** |

*(स्त्रोत: शालेय शिक्षण विभाग, केंद्र शासन, युडायस प्लस, २०१८-१९)*

☞ राज्यात एकूण १ लाख ९ हजार ९४२ शाळा आहेत, त्यापैकी ४० हजार ४८८ (३६.८३%) शाळांना नियमित मुख्याध्यापक उपलब्ध असून ६९ हजार ४५४ (६३.१७%) शाळांना मुख्याध्यापक उपलब्ध नाहीत.

☞ राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था ज्यामध्ये जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या ६५ हजार १६२ शाळा असून त्यापैकी ५४ हजार ५२५ (८३.६८%) शाळांना नियमित मुख्याध्यापक नाहीत.

☞ राज्यात १९ हजार ३७५ खाजगी विनाअनुदानित शाळा असून, त्यापैकी ८ हजार १६६ (४२.१५%) शाळांना नियमित मुख्याध्यापक उपलब्ध नाहीत.

☞ राज्यात २३ हजार ५५४ खाजगी अनुदानित शाळा असून, त्यापैकी ५ हजार ९७५ (२५.३७%) शाळांना नियमित मुख्याध्यापक नाहीत.

☞ राज्यात आदिवासी विकास विभागाच्या ५२० शाळा असून, त्यापैकी १८७ (३५.९६%) शाळांना मुख्याध्यापक नाहीत.

☞ राज्यात १५४ मदरसा आहेत. त्यापैकी ११३ (७३.३८%) मदरसांना नियमित मुख्याध्यापक नाहीत.

☞ राज्यात ३० सैनिकी शाळा आहेत. त्यापैकी १ शासकीय तर २९ खाजगी आहेत, मात्र त्यापैकी एकाही शाळेला मुख्याध्यापक नाही.

☞ राज्यात १०६ केंद्रीय विद्यालय असून त्यापैकी २८ (२६.४२%) विद्यालयांना नियमित मुख्याध्यापक नाहीत.

# राज्याचा शिक्षण विभागावरील खर्च मागील ९ वर्षात 'स्थूल राज्य उत्पन्ना'च्या सरासरी १.९० टक्के 'समग्र शिक्षा अभियाना'वरील ५२ टक्के निधी अखर्चित

शालेय शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र असून, या क्षेत्राकडे दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहणे गरजेचे आहे. देशाची वा राज्याची प्रगती ही त्या देशाच्या वा राज्यातील शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असते. जगाचा विचार केला तर लहान लहान देशही शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर खर्च करतात. देशाचा शिक्षणावरील सरासरी खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.१% असून, महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नाचा विचार केला तर हे प्रमाण हे कधीच २% पेक्षा जास्त राहिलेले नाही. शिक्षण क्षेत्रावर किमान ६% खर्च करण्यात यावे असे वर्ष १९६८ पासून २०१९ पर्यंतच्या प्रत्येक शिक्षणविषयक धोरणात सुचवले आहे. मात्र त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना दिसत नाही.

वर्ष २०१८-१९ मध्ये स्थूल राज्य उत्पन्न २५ लाख ७९ हजार ६२८ कोटी रुपये होते. त्या वर्षी राज्य शासनाने शिक्षण विभागावर ४४ हजार ३८० कोटी रुपये खर्च केले होते. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत हा खर्च १.७२% इतका कमी राहिला आहे. या वर्षात शिक्षणावर झालेला खर्च हा सर्वात कमी होता.

'समग्र शिक्षा अभियान' ही महत्त्वाची योजना असून ती 'सर्व शिक्षा अभियान', 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' तसेच 'शिक्षक शिक्षण' या तीन योजना एकत्रित करून राबविली जाते यासाठी वर्ष २०१८-१९ ती २०२०-२१ या तीन वर्षाच्या कालावधीत या योजनेसाठी ६ हजार ४८५ कोटी ५० लाखांचा निधी अर्थसंकल्पीत केला होता, त्यापैकी ३ हजार ४०५ कोटी ९५ लाखांचा निधी खर्च करण्यात आला असून ३ हजार ७९ कोटी ५५ लाखांचा निधी अखर्चित राहिला आहे. अखर्चित निधीचे हे प्रमाण ५२.५०% इतके मोठे राहिले आहे.

'दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रमा'साठी २०१८-१९ पासून २०२०-२१ पर्यंत ३ लाख ७ हजार दिव्यांग लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये वाढ झालेली नाही मात्र त्यांच्यासाठी असलेल्या निधीत मात्र सातत्याने घट होताना दिसते आहे. वर्ष २०१८-१९ मध्ये ९१ कोटी ८१ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. त्यात घट होऊन ही रक्कम वर्ष २०१९-२० मध्ये ३३ कोटी ६२ लाखांवर आली तर वर्ष २०२०-२१ मध्ये त्यात आणखी घट होऊन ती रक्कम २२ कोटी ९६ लाखांवर आलेली दिसते. कोरोना काळात दिव्यांग विद्यार्थ्यांचे मोठे हाल होताना आपल्याला वरील आकडेवारी वरून लक्षात येते.

शालेय पोषण आहार ही योजना गरीब विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची योजना ठरली आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पोषण व्हावे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. वर्ष २०१८-१९ मध्ये या योजनेसाठी १ हजार ५६६ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. वर्ष २०१९-२० मध्ये ९७ कोटी रुपयांची घट झाली. तर कोरोना काळात या योजनेवर केवळ २७५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे. त्यामुळे शाळा बंद राहिल्याने राज्यातील ९९ लाख ९४ हजार विद्यार्थी 'शालेय पोषण आहार' योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या निरनिराळ्या योजना कार्यरत आहेत, त्यामध्ये 'अहिल्याबाई होळकर योजना' ही महत्त्वाची योजना असून वर्ष २०१८-१९ मध्ये ११ लाख ६१ हजार विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला होता त्यासाठी ९६ कोटी ८१ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. वर्ष २०१९-२० मध्ये लाभार्थी विद्यार्थिनींनी मध्ये दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली लाभार्थी विद्यार्थिनींची संख्या २४ लाख ७६ हजारांवर गेली या योजनेवर १४१ कोटी ५९ लाखांचा खर्च झाला तर वर्ष २०२०-२१ मध्ये लाभार्थी विद्यार्थिनींच्या संख्येत घट झाली ही संख्या ९ लाख २८ हजारावर आली असून त्यांच्यासाठी खर्च झालेली रक्कम ४४ कोटी ७ लाखांवर आली. याचाच अर्थ कोरोना काळात मुलींच्या योजनावरील खर्चाला देखील कात्री लागली आहे.

शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना आजच्या घडीला सुरू असल्या तरी त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही, या योजनांच्या खर्चात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते.

## 'राज्य स्थूल उत्पन्ना'च्या तुलनेत 'शालेय शिक्षण विभागा'वरील खर्च

वर्ष २०११-१२ ते २०१९-२० या ९ वर्षाच्या कालावधीत राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत राज्याच्या शिक्षण विभागावर झालेला प्रत्यक्ष खर्च व त्याचे प्रमाण तसेच शिक्षणविषयक धोरणानुसार तसेच किमान ६% खर्च करणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष होणारा खर्च तसेच खर्चातील कमतरता, कमतरतेचे प्रमाण या सर्वांचा आढावा खालील प्रमाणे.

### १) स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत शिक्षण विभागावरील खर्च:

**तक्ता क्र. १३** *रु. कोटीत*

| वर्ष | स्थुल राज्य उत्पन्न | स्थुल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत ६% खर्च अपेक्षित | शालेय शिक्षण विभागाचा प्रत्यक्ष खर्च | स्थुल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत शिक्षण विभागाचे खर्चाचे प्रमाण | स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कमतरता | कमतरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | १२८०३६९ | ७६८२२ | २६०७२ | २.०४ | ५०७५० | ३.९६ |
| २०१२-१३ | १४५९६२९ | ८७५७८ | २९०९२ | १.९९ | ५८४८६ | ४.०१ |
| २०१३-१४ | १६४९६४७ | ९८९७९ | ३२५९४ | १.९८ | ६६३८५ | ४.०२ |
| २०१४-१५ | १७७९१३८ | १०६७४८ | ३४७७५ | १.९५ | ७१९७३ | ४.०५ |
| २०१५-१६ | १९६६२२५ | ११७९७४ | ३७४५६ | १.९० | ८०५१८ | ४.१० |
| २०१६-१७ | २१९८३२४ | १३१८९९ | ३९०२४ | १.७८ | ९२८७५ | ४.२२ |
| २०१७-१८ | २३५२७८२ | १४११६७ | ४१९३६ | १.७८ | ९९२३१ | ४.२२ |
| २०१८-१९ | २५७९६२८ | १५४७७८ | ४४३८० | १.७२ | ११०३९८ | ४.२८ |
| २०१९-२० | २८१८५५५ | १६९११३ | ५४८१० | १.९४ | ११४३०३ | ४.०६ |
| **सरासरी प्रत्यक्ष खर्च** | **२००९३६६** | **१२०५६२** | **३७७९३** | **१.८८** | **८२७६९** | **४.१२** |
| २०२०-२१ (सु.अं.) | २६६१६२९ | १५९६९८ | ५५६५८ | २.०९ | १०४०४० | |
| २०२१-२२ (अ.अं.) | २९८१०२४ | १७८८६१ | ६२९०२ | २.११ | ११५९५९ | |

*(**स्त्रोत:** महाराष्ट्राचा संक्षिप्त अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, खर्चाचे तपशीलवार अंदाज-भाग २-वर्ष २०१३-१४ ते २०२१-२२)*

***टीप:** निती आयोगाच्या शिफारशीनुसार वर्ष, २०२२ पर्यंत किमान शिक्षणावरील खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% अपेक्षित*

- ☞ राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या किमान ६% खर्च करणे अपेक्षित असताना मागील ९ वर्षातील सरासरी खर्च १.८८%
- ☞ वर्ष २०११-१२ ते २०१९-२० या कालावधीत राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न सरासरी २० लाख ९ हजार ३६६ कोटी रुपये इतके होते. त्यातुलनेत राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागावर ३७ हजार ७९३ कोटी रुपये इतके खर्च केले खर्चाचे हे प्रमाण १.८८% राहिले आहे. राज्य शासनाने या कालावधीत शालेय शिक्षणावर १ लाख २० हजार ५६२ कोटी रुपये (६%) खर्च करणे अपेक्षित होते. याचाच अर्थ ८२ हजार ७६९ कोटी रुपये (४.१२%) कमी खर्च झाले आहेत.
- ☞ महाराष्ट्र राज्याचे वर्ष २०२१-२२चे स्थूल राज्य उत्पन्न अंदाजित २९ लाख ८१ हजार २४ कोटी रुपये इतके आहे, त्या तुलनेत राज्य शासनाने शालेय शिक्षण विभागासाठी ६२ हजार ९०२ कोटी रुपये अंदाजित केले आहे. शालेय शिक्षण विभागासाठी अंदाजित केलेला अर्थसंकल्पाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी २.११% इतके आहे.
- ☞ वर्ष २०११-१२ या वर्षी शालेय शिक्षण विभागावर २६ हजार ७२ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते, त्यावेळी राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न १२ लाख ८० हजार २६९ कोटी रुपये होते. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत शालेय शिक्षण विभागाचा खर्चाचे प्रमाण २.०४% होते. गेल्या ९ वर्षातील हे सर्वात जास्त होते.
- ☞ वर्ष २०१८-१९ मध्ये स्थूल राज्य उत्पन्न २५ लाख ७९ हजार ६२८ कोटी रुपये होते. त्यावर्षी राज्य शासनाने शिक्षण विभागावर ४४ हजार ३८० कोटी रुपये खर्च केले होते. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत हा खर्च १.७२% इतका कमी राहिला आहे. या वर्षात शिक्षणावर झालेला खर्च हा सर्वात कमी होता.

## ‘समग्र शिक्षा अभियान’

‘सर्व शिक्षा अभियान’, ‘राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान’ व ‘शिक्षक शिक्षण’ या तीन योजना समायोजित करून पूर्व शालेय पासून उच्च माध्यमिकपर्यंत सर्वसमावेशक व दर्जेदार शिक्षणासाठी ‘समग्र शिक्षा’ ही नवीन एकात्मिक योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यात राबविली जात आहे. या कार्यक्रमांतर्गत शालेय किमान मानांकनाची पूर्तता करण्याची खात्री देण्यात आली आहे. शालेय शिक्षणातील सामाजिक व मुल–मुलींमधील भेद कमी करणे हा देखील उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक शिक्षण विद्यार्थ्यांच्या अध्ययन फलनिष्पत्तीत वाढ करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. मात्र या योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. वर्ष २०१८ ते २०२०-२१ या कालावधीत ६ हजार ४८७ कोटी ५० रु. लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता, त्यापैकी रु. ३ हजार ८१ कोटी ५५ लाखांचा निधी खर्च करण्यात आला तर रु. ३ हजार ४०५ कोटी ९५ लाखांचा निधी अखर्चित राहिला आहे.

## २) समग्र शिक्षा अभियानांतर्गत आर्थिक तरतूद व खर्च :

**तक्ता क्र. १४** *रु. कोटीत*

| वर्ष | मंजूर निधी | खर्च | अखर्चित निधी | अखर्चित निधीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | १८५४.५४ | १३५४.०६ | ५००.४८ | २७.०० |
| २०१९-२० | २८२५.४७ | १४०४.५३ | १४२०.९४ | ५०.२९ |
| २०२०-२१* | १८०७.४९ | ३२२.९६ | १४८४.५३ | ८२.१३ |
| **एकूण** | **६४८७.५०** | **३०८१.५५** | **३४०५.९५** | **५२.५०** |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद)*

☞ वर्ष २०१८-१९ मध्ये या अभियानासाठी रु. १ हजार ८५४ कोटी ५४ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता, त्यापैकी केवळ रु. १ हजार ३५४ कोटी ६ लाख (७३.०१%) खर्च करण्यात आले. म्हणजे रु. ५०० कोटी ४८ लाखांचा (२७%) निधी अखर्चित राहिला.

☞ पुढील वर्ष २०१९-२० मध्ये या अभियानासाठी रु. २ हजार ८२५ कोटी ४७ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला त्यापैकी रु. १ हजार ४०४ कोटी ५३ लाखांचा (४९.७१%) निधी खर्च करण्यात आला. तर रु. १ हजार ४२० कोटी ९४ लाखांचा (५०.२९%) निधी अखर्चित राहिला.

☞ वर्ष २०२०-२१ मध्ये मंजूर निधीतच मोठी घट झाली रु. १ हजार ८०७ कोटी ४९ लाखांचा निधी देण्यात आला, त्यापैकी डिसेंबर, २०२० पर्यंत ९ महिन्यांच्या कालावधीत केवळ रु. ३२२ कोटी ९६ (१७.८७%) लाखांचा खर्च झाला आहे. जरी ३ महिने शिल्लक असले तरी या कालावधीत समग्र अभियानांतर्गत रु. १ हजार ४८४ कोटी ५३ (८२.१३%) लाखांचा निधी खर्च करायचा आहे.

☞ वर्ष २०१८-१९ ते २०२०-२१ या ३ वर्षात समग्र शिक्षा अभियानांतर्गत रु. ६ हजार ४८७ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला, त्यापैकी रु. ३ हजार ८१ कोटी ५५ लाखांचा (४७.५०%) निधी खर्च झाला. तर ३ हजार ४०५ कोटी ५५ लाखांचा (५२.५०%) निधी अखर्चित राहिला आहे.

## ‘दिव्यांग समावेशक शिक्षण’

विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण व्यवस्थेत सर्वसाधारण मुलांसोबत दर्जेदार शिक्षण मिळून त्याची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी राज्यात ‘दिव्यांग समावेशक शिक्षण’ कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात विशेष गरज असलेली मुले शोधून त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, आवश्यकतेनुसार ब्रेल लिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवण यंत्रे व उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादी शिक्षण विषयक आणि पुनर्वसनाकरिता सहाय्यभूत सेवा पुरवणे याचा समावेश आहे.

### ३) दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रम लाभार्थी व खर्च:

तक्ता क्र. १५ *(लाभार्थी लाखात, रु. कोटीत)*

| वर्ष | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक स्तर | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| प्राथमिक (१ली ते ८वी) | २.५२ | ८७.३२ | २.५२ | ३१.६५ | २.५१ | २२.९६ |
| माध्यमिक (९वी ते १२वी) | ०.५५ | ४.४९ | ०.५५ | १.९७ | ०.५६ | ०.०० |
| **एकूण** | **३.०७** | **९१.८१** | **३.०७** | **३३.६२** | **३.०७** | **२२.९६** |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद)*

☞ वर्ष २०१८-१९ मध्ये प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ ली ते ८वीच्या २ लाख ५२ हजार लाभार्थ्यांना दिव्यांग शिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला असून, यासाठी रु. ८७ कोटी ३२ लाख खर्च करण्यात आले. याचाच अर्थ प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी ३ हजार ४६५ रुपये खर्च करण्यात आले तर त्याच वर्षी माध्यमिक स्तरावरील इयत्ता १ली ते १२वी पर्यंत ५५ हजार विद्यार्थ्यांना लाभ घेतला, त्यासाठी रु. ४ कोटी ४९ लाख खर्च करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी ८१६ रुपये खर्च करण्यात आले.

☞ वर्ष २०१९-२० मध्ये प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ ली ते ८वीच्या २ लाख ५२ हजार लाभार्थ्यांना दिव्यांग शिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला असून, यासाठी रु. ३१ कोटी ६५ लाख खर्च करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी १ हजार २५६ रुपये खर्च करण्यात आले. तर त्याच वर्षी माध्यमिक स्तरावरील इयत्ता १ली ते १२वी पर्यंत ५५ हजार विद्यार्थ्यांना लाभ घेतला, त्यासाठी रु. १ कोटी ९७ लाख खर्च करण्यात आले, प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी ३५८ रुपये. खर्च करण्यात आला.

☞ वर्ष २०२०-२१ मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या ८ महिन्यात) प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ ली ते ८वीच्या २ लाख ५१ हजार लाभार्थ्यांना दिव्यांग शिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला असून, यासाठी रु. २२ कोटी ९६ लाख खर्च करण्यात आले. याचाच अर्थ या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी ९१५ रुपये खर्च करण्यात आले. तर त्याच वर्षी माध्यमिक स्तरावरील इयत्ता १ली ते १२वी पर्यंत ५६ हजार विद्यार्थ्यांचे नाव या कार्यक्रमासाठी नोंदविण्यात आले, मात्र त्यापैकी एकाही विद्यार्थ्याला या योजनेचा लाभ मिळालेला नाही. मागील ८ महिन्यात हा सर्व निधी अखर्चित आहे.

## ‘शालेय पोषण आहार’, योजना

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थिती वाढवणे त्याचबरोबर त्यांचा पोषण मूल्य स्तर सुधारणे या उद्देशाने केंद्र शासनाने ‘शालेय पोषण आहार योजना’ सुरू केली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना तयार भोजन पुरविण्यात येते. याबाबत वर्ष २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षातील लाभार्थी व खर्चाची माहिती देण्यात आली आहे. मात्र वर्ष २०२०-२१ मध्ये लाभार्थी संख्येत वाढ झालेली असली तरी, खर्चात मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे.

## ४) शालेय पोषण आहार योजनेवरील लाभार्थी व खर्च:

**तक्ता क्र. १६** *(लाभार्थी लाखात, रु. कोटीत)*

| वर्ष | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक स्तर | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| प्राथमिक (इ.१ली ते ५वी) | ५६.९९ | ९३८ | ५१.४७ | ८०८ | ६०.७० | १५१ |
| माध्यमिक (इ. ६वी ते ८वी) | ३६.३४ | ६२८ | ३२.५६ | ६६१ | ३९.२४ | १२४ |
| एकूण | ९३.३३ | १५६६ | ८४.०३ | १४६९ | ९९.९४ | २७५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद)*

☞ वर्ष २०१८-१९ मध्ये प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ली ते ५वीच्या ५६ लाख ९९ हजार लाभार्थ्यांना 'शालेय पोषण आहार', योजनेचा लाभ घेतला असून, यासाठी रु. ९३८ कोटी खर्च करण्यात आले. तर त्याच वर्षी उच्च प्राथमिक गटातील इयत्ता ६वी ते ८वी पर्यंतच्या ३६ लाख ३४ हजार विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ मिळाला, त्यासाठी रु. ६२८ कोटी खर्च करण्यात आले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी १ हजार ६७८ रुपये खर्च करण्यात आले आहेत.

☞ वर्ष २०१९-२० मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर या ८ महिन्यात) प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ली ते ५वीच्या ५१ लाख ४७ हजार लाभार्थ्यांनी 'शालेय पोषण आहार' योजनेचा लाभ घेतला असून, यासाठी रु. ८०८ कोटी खर्च करण्यात आले. तर त्याच वर्षी उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६वी ते ८वी पर्यंत ३२ लाख ५६ हजार विद्यार्थ्यांनी 'शालेय पोषण आहार', योजनेचा लाभ घेतला, त्यासाठी रु. ६६१ कोटी खर्च करण्यात आले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी १ हजार ७४८ रुपये खर्च करण्यात आले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांमागे सरासरी २७५ रुपये खर्च करण्यात आले आहेत.

☞ वर्ष २०२०-२१ मध्ये, (एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या ८ महिन्यात) प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ली ते ५वीच्या ६० लाख ७० हजार लाभार्थ्यांना 'शालेय पोषण आहार', योजनेचा लाभ घेतला असून, यासाठी रु. १५१ कोटी खर्च करण्यात आले. तर त्याच वर्षी उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६वी ते ८वी पर्यंत ३९ लाख २४ हजार विद्यार्थ्यांनी शालेय पोषण आहार योजनेचा लाभ घेतला. या योजनेसाठी रु. १२४ कोटी आतापर्यंत खर्च करण्यात आले आहेत.

## 'विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन', देणाऱ्या योजना

मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे व पालकांचा आर्थिक भार कमी व्हावा यासाठी राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांना विविध सवलती दिल्या जातात. त्यामध्ये १ली ते ४थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे, १ली ते १०वी इयत्तेतील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत विद्या वेतन दिले जाते.

## ५) शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची स्थिती, लाभार्थी व खर्च :

तक्ता क्र. १७ *(लाभार्थी लाखात, रु. कोटीत)*

| वर्ष | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| योजना | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| १ली ते ४थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | १.१० | ०.८८ | २.५७ | २.१२ | ३.३५ | २.३० |
| १ली ते १०वी इयत्तेतील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | २६.३४ | ३.७२ | १५.७१ | २.३८ | १५.७१ | ४.०० |
| आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण | १.३६ | १.२८ | ०.११ | ०.५४ | ०.६२ | १.५० |
| आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत विद्यावेतन | ०.०१ | ०.०३ | ०.०१ | ०.०२ | ०.०१ | ०.०५ |
| **एकूण** | **२८.८१** | **५.९१** | **१८.४०** | **५.०६** | **१९.६९** | **७.८५** |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद)*

☞ इयत्ता १ली ते ४थी च्या गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे, इयत्ता १ली ते १०वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत विद्या वेतन या योजनांसाठी वर्ष २०१८-१९ मध्ये २८ लाख ८१ हजार विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. ५ कोटी ९१ लाख खर्च करण्यात आले. यावर्षी प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी २० रुपये ५१ पैसे खर्च झाले आहेत.

☞ इयत्ता १ली ते ४थी च्या गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे, इयत्ता १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत विद्या वेतन या योजनांसाठी वर्ष २०१९-२० मध्ये १८ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. ५ कोटी ०६ लाख खर्च करण्यात आले. यावर्षी प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी २७ रुपये ५० पैसे खर्च करण्यात आले.

☞ इयत्ता १ली ते ४थी च्या गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे, इयत्ता १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत विद्या वेतन या योजनांसाठी वर्ष २०२०-२१ मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या ८ महिन्यात) १९ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. ७ कोटी ८५ लाख खर्च करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी ३९ रुपये ८७ पैसे खर्च करण्यात आले आहेत.

## ‘मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन’, देणाऱ्या योजना

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थित भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर (म.रा.प.म.बसमधून मोफत प्रवास),११वी व १२वी इयत्तेत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, अध्यापक विद्यालयामध्ये ३०% आरक्षण व मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, इत्यादी विविध योजना राबवित आहे. मात्र कोरोना काळात या योजनेच्या लाभार्थी संख्येत व खर्चात मोठी घट झाल्याचे दिसून येते.

### ६) मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची स्थिती, लाभार्थी व खर्च:

**तक्ता क्र. १८** *(लाभार्थी लाखात, रु. कोटीत)*

| वर्ष | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| योजना | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| उपस्थिती भत्ता योजना | १.४७ | ३.२४ | १.४७ | १.७८ | - | - |
| अहिल्याबाई होळकर योजना | ११.६१ | ९६.८१ | २४.७६ | १४१.५९ | ९.२८ | ४४.०७ |
| ११वी व १२वी इयत्तेतील मुलींना मोफत शिक्षण | २.४४ | १.८३ | २.९८ | १.२४ | ०.५१ | २.०० |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | १८.७० | ०.०४ | २०.०७ | ०.०४ | ५.२८ |
| **एकूण** | **१६.५६** | **१२०.५८** | **२९.२५** | **१६४.६८** | **९.८३** | **५१.३५** |

*(स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद)*

- ☞ वर्ष २०१८-१९ मध्ये मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थित भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर (म.रा.प.म. बसमधून मोफत प्रवास), ११वी व १२वी इयत्तेत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, अध्यापक विद्यालयामध्ये ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा १६ लाख ५६ हजार विद्यार्थिनींना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. १२० कोटी ५८ लाख खर्च करण्यात आले. यावर्षी प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी ७२८ रुपये, खर्च झाले आहेत.

- ☞ वर्ष २०१९-२० मध्ये मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थित भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर (म.रा.प.म. बसमधून मोफत प्रवास), ११वी व १२वी इयत्तेत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, अध्यापक विद्यालयामध्ये ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा २९ लाख २५ हजार विद्यार्थिनींना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. १६४ कोटी ६८ लाख खर्च करण्यात आले. यावर्षी प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी ५६३ रुपये, खर्च झाले आहेत.

☞ वर्ष २०२०-२१ मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या ८ महिन्यात) मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थिती भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर (म.रा.प.म. बसमधून मोफत प्रवास), ११वी व १२वी इयत्तेत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, अध्यापक विद्यालयामध्ये ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा २९ लाख २५ हजार विद्यार्थिनींना लाभ देण्यात आला त्यासाठी रु. १६४ कोटी ६८ लाख खर्च करण्यात आले. यावर्षी प्रत्येक लाभार्थ्यावर सरासरी ५२२ रुपये, खर्च झाले आहेत.